संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
18 JUN 2026
प्राप्त झाले सही.........................

सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित करणेबाबत
श्री. रविंद्र नामदेवराव जोगी, लेखा अधिकारी.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:-संलेको-२०२६/प्र.क्र.९५ E-१६७८७१४ /कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १६ जून, २०२६.

**संदर्भ**:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/स.प्र.का./र.ना.जोगी/०२.२६/२१९/१८४/८७७, दि. ११.०२.२०२६

२) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई यांचे पत्र जा. क्र. नादेकृसंप्र-०४२४/प्र.क्र.३९ /मृवि/११०६, दि.३१.१२.२०२४,

३) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांचे आदेश क्र.ससंलेवको/आस्था-४/मविलेसे/गट ब (राप)/श्री. मानमोडे/पदस्थापना/२०२५/७५, दि.०९.०१.२०२५

४) शासन, वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.२००/कोषा प्रशा-२, दि.१५.०१.२०२५,

५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांचे आदेश क्र. ससंलेवको/आस्था-४/ लेखा अधिकारी/ श्री. जोगी/पर्यायी व्यवस्था/२०२५/१६५, दि.१६.०१.२०२५

६) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती यांचे पत्र जा.क्र. आस्था अ-१/ रूजू अह./श्री. जोगी /४२२/२०२५, दि. २३.०१.२०२५

७) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांचे आदेश क्र. संसंलेवको/आस्था-४/ श्री. जोगी व श्री. मानमोडे/ले.अ./प्रतिक्षाधीन कालावधी/२०२५/२२००, दि.०८.०९.२०२५

८) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांचे आदेश क्र. संसंलेवको/आस्था-२/रजा/०४-२०२५/कावि-१८८०,१८८८/श्री. जोगी/२०२५/८०५, दि.०८.०४.२०२५

-: **शासन आदेश** :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात क्षेत्रिय स्तरावर कार्यरत नियमित लेखा अधिकारी यांच्या सेवा दि.३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी संपुष्टात येत असल्याने संदर्भ क्र.२ अन्वये त्यांच्या अधिनस्त कार्यरत लेखा अधिकाऱ्यांना दि.३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील खालील तक्त्यात नमूद लेखा अधिकारी यांना दि.३१.१२.२०२४ (म.नं.) रोजी सबंधित उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यमुक्त केलेल्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र नामदेवराव जोगी, लेखा अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, आर्वी, जि. वर्धा |

01209/2026/1631
19-06-26

२. शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ नूसार श्री. जोगी, लेखा अधिकारी हे पुढील पदस्थापनेच्या प्रतिक्षेत दि.०१.०१.२०२५ (म.पू.) रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयात दि.०१.०१.२०२५ रोजी रुजू झाले. सह संचालक, लेखा व कोषागारे यांचे दि.८.९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये श्री. जोगी दि. ०२.०१.२०२५ ते ०९.०१.२०२५ या कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी, ४४ आर्वी विधासभा मतदार संघ कार्यालयात कार्यरत होते.

३. वित्त विभागाचे दि.१५.०१.२०२५ रोजीचे शासन आदेशान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेल्या श्री. मानमोडे यांना स्तंभ ३ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या पदावर नियमित पदस्थापना देण्यात आली.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | नियमित पदस्थापना दिलेले कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. रविंद्र नामदेवराव जोगी, लेखा अधिकारी | लेखा अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, अमरावती |

४. त्यानुसार सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांचे दि.१६.०१.२०२५ रोजीचे आदेशान्वये वरीलप्रमाणे नियमित पदस्थापना दिलेल्या कार्यालयात रुजू होण्यासाठी श्री. जोगी यांना दि.१६.०१.२०२५ (म.नं.) रोजी संबंधित कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

५. श्री. जोगी यांच्या पदस्थापनेच्या प्रतिक्षेच्या कालावधीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि.०१.०१.२०२५ | १ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेखा व कोषागारे, नागपूर कार्यालयात रुजू |
| २ | दि.०२.०१.२०२५ ते दि.०९.०१.२०२५ | ८ दिवस | महाराष्ट्र सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कामी निवडणूक निर्णय अधिकारी, ४४ आर्वी विधानसभा मतदार संघ कार्यालयात कार्यरत |
| ३ | दि.१०.०१.२०२५ ते १५.०१.२०२५ | ६ दिवस | अर्जित रजा |
| ४ | दि.१६.०१.२०२५ | १ दिवस | सह संचालक लेखा व कोषागारे कार्यालयात कार्यरत |
| | एकुण | १६ दिवस | |

६. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदीनुसार श्री. रविंद्र नामदेवराव जोगी, लेखा अधिकारी यांचा दि. ०१.०१.२०२५ ते १६.०१.२०२५ असा एकूण १६ दिवसांचा प्रतिक्षाधीन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

७. यास्तव, श्री. रविंद्र नामदेवराव जोगी, लेखा अधिकारी यांना दि.०१.०१.२०२५ ते दि.१६.०१.२०२५ पर्यंत १६ दिवसांच्या नियमित करण्यात आलेल्या प्रतिक्षाधीन कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता.र.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) सह संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर,*
४) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
५) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६) संबंधित लेखा अधिकारी,*
७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)